**श्री. राहूल दशरथ कुंभार,**

विरुध्द...

**अध्यक्ष, श्री बिरदेव शिक्षण संस्था व इतर**

**<u>निशानी क्र. ३९ खालील आदेश</u>**

(दिनांक १८ ऑगस्ट २०२५)

प्रस्तुतचा अर्ज हा जाब देणार क्रमांक २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेतील आदेश ६ व नियम १७ कलम १५१ अन्वये बचावपक्षाच्या लेखी म्हणण्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. अपिलकार यांनी निशानी ४१ वर त्यांचे म्हणणे मांडून अर्जास विरोध दर्शविला.

२. जाब देणार क्रमांक २ यांच्या कथनाप्रमाणे अपिलकार यांनी प्रस्तुतचे अपिल हे सेवासमाप्तीविरूध्द दाखल करून सदर काळात कोठेही सेवा बजावली नसल्याचे कथन करून निशानी २३ वर त्यानुषंगे शपथपत्र दाखल केले आहे. परंतू दरम्यानच्या काळामध्ये अपिलकार हे जिनरत्न पब्लीक स्कूल, खटकोळे माळ, इंगळी रोड, पट्टणकोडोली येथे सेवा बजावीत असलेचे कागदोपत्री पुरावे जाब देणार यांस प्राप्त झाले आहेत. सदर बाब कैफीयतीमध्ये नमूद केल्यास त्यानुषंगाने जाबदार पुरावे सादर करू शकतील व सेवासमाप्तीच्या काळामध्ये अपिलकार बेरोजगार नव्हते हे दाखविण्याची संधी जाबदार यांना मिळाल्यास थकित वेतनाचा मुद्या निर्णयीत करताना मदत होईल. सबब, निशानी १८ वर सादर केलेल्या म्हणण्यामध्ये दुरूस्ती करून परिच्छेद क्र. २९ मध्ये दुरूस्ती करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

३. अपिलकार यांच्या कथनाप्रमाणे जाबदार यांनी त्याचे म्हणणे निशानी क्र. १८ वर दिनांक २०.०४.२०१९ रोजी दाखल केले आहे. मागील ५ वर्षापासून प्रस्तुतचे अपिल प्रलंबित असताना वेळकाढूपणा करण्याकरीता प्रस्तुतचे अर्ज दाखल केला आहे. जिनरत्न पब्लीक स्कूल या शाळेमध्ये अपिलकार यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलविले असलेने ते कार्यक्रमाकरीता हजर होते. जाब देणार यांनी दाखल केलेल्या शाळेच्या माहिती पत्रकावरून अपिलकार शाळेत सेवा देत असल्याचे स्पष्ट होत नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४.    उभय विद्यमान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या लेखी कैफीयतीप्रमाणे युक्तीवाद सादर केला. जाब देणार यांचे विद्यमान विधिज्ञ श्री. पाटील यांनी प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अपिलदार हे आता शिक्षक म्हणून नोकरी करत असलेने अपिलकार आजमितीस बेरोजगार नसल्याचे कैफीयत दुरुस्त करुन न्याय पटलावर आणणे गरजेचे असल्याचा युक्तीवाद मांडला. याउलट अपिलकार यांच्या युक्तीवादाप्रमाणे अपिलकार नोकरीत असल्याबाबतचा पुरावा सादर केला नसल्याने कैफीयत दुरूस्त करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरत नाही.

८.    अपिल दाखल केल्यानंतरच्या घडामोडी या महत्त्वपूर्ण घडामोडी ठरतात. अपिलकार आजमितीस कुठल्या मार्गाने उत्पन्न मिळवित आहेत हा मुद्या काहीअंशी अपिलात मागण्यात आलेल्या अनुतोषाच्या मुळास जातो, सबब जाब देणार यांनी मागितलेली कैफीयतीच्या दुरुस्तीन्वये अपिलाचे अथवा बचाव लेखी कैफीयतीचे स्वरुप बदलत नसल्याचे दिसून येते तसेच चालू घडामोडी न्यायपटलावर येणे गरजेचे असल्याच्या मतास मी प्राप्त झाले आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करुन दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ व नियम १७ अन्वये निशानी क्रमांक १८ वरील बचाव लेखी कैफीयतीमध्ये परिच्छेद क्र. २९ दाखल करुन बचाव लेखी कैफीयत दुरुस्त करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२. जाब देणार यांनी आदेशापासून ७ दिवसाचे आत लेखी कैफीयत दुरुस्त करुन दुरुस्त कैफीयतीची प्रत न्यायपटलावर सादर करावी.

३ बचाव कैफीयतीमध्ये दुरुस्ती झाल्याने अपिलकार यांना त्यानुषंगाने रिजॉइंडर दाखल करण्यास मुभा देण्यात येत आहे.

Digitally signed by VAISHALI NIVRUTI DHAVLE
Date: 2025.09.08 17:09:22 +0530

तारीख – १८/०८/२०२५    (वै. नि. ढवळे)
ठिकाण - कोल्हापूर    पीठासीन अधिकारी,
शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर